दैनिक औरंगाबाद
# विश्व मित्र
बुधवार दि. २६ ऑक्टोबर २००५

## विविध कार्यक्रमांनी खा. वसंत चव्हाण यांचा वाढदिवस साजरा

औरंगाबाद - प्रतिनिधी

आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे संचलित इंडस बालकामगार शाळेत वसंत चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त शहराच्या प्रगती कॉलनी व आरेफ कॉलनी येथे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

प्रगती कॉलनी येथे संचलित बालकामगार शाळेत रांगोळी स्पर्धा व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन छप्परबंद मुस्लिम शाह समाजाचे मराठवाडा अध्यक्ष साजिद पाशा यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा शाह सुरैय्या खान ह्या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून इंडस प्रकल्पाचे कम्युनिटी वर्कर कल्पना भगत उपस्थित होत्या. रांगोळी स्पर्धेत एकूण ४२ शाळेतील मुलींनी सहभाग नोंदवला व आपल्यतील सुप्त गुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन घडविले. मुलींनी भारताचा नकाशा, झेंडा, विविध रंगबेरंगी घरगुती रांगोळी, विविध आकर्षित फुले



दृष्ये रांगोळीद्वारे काढून उपस्थितांचे मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे, प्रशिस्ती पदक व प्रमाणपत्र देण्यात आले. पहिले बक्षिस लता बांगडे, दुसरे दिपाली बांगडे, तिसरे दिपाली घुसळे व उत्तेजणार्थ पारितोषिक मनिषा खंडागळे या विजेतील देण्यात आले. याशिवाय चित्रकला स्पर्धेत एकूण ५९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यातील विजेत्यांना बक्षिस व प्रमाणपत्र देण्यात आले.